# प्रकल्प प्रवर्तक मेसर्स दौंड शुगर प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ९९, आलेगाव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,५००.० टन पासून २०,०००.० टन प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती क्षमता विस्तार १८.० मेगावॅटपासून ८२.० मेगावॅटपर्यत क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतचा इतिवृतांत

मेसर्स दौंड शुगर प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ९९, आलेगाव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,५००.० टन पासून २०,०००.० टन प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती क्षमता विस्तार १८.० मेगावॅटपासून ८२.० मेगावॅटपर्यत क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी गुरुवार, दिनांक ०६-१०-२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता प्रकल्प स्थळी आयोजित करण्यात आलेली होती.

श्री प्रताप जगताप, उप प्रादेशिक अधिकारी,पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,पुणे तथा समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी श्री संजय तेली, अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे तथा अध्यक्ष, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, श्री शंकर वाघमारे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे तथा सदस्य, पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती, प्रकल्प प्रवर्तकांचे प्रतिनिधी, पत्रकार, पर्यावरण क्षेत्रात कार्यरत असणा-या संस्था व उपस्थित असलेल्या स्थानिक जनतेचे महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि जिल्हाधिकारी कार्यालय, पुणे यांच्यातर्फे स्वागत केले. समितीच्या अध्यक्षांच्या परवानगीने पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी बाबतची प्रस्तावना विषद केली.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी असे सांगितले की भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालय, नवी दिल्ली यांच्या दिनांक १४ सप्टेंबर, २००६ व सुधारित दिनांक १ डिसेंबर, २००९ च्या अधिसूचनेनुसार विशिष्ट प्रकल्पांना पर्यावरणविषयक अनुमती घेणे बंधनकारक असून त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहीर लोकसुनावणी आयोजीत करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.

समन्वयक, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी सांगितले की मेसर्स दौंड शुगर प्रायव्हेट लिमिटेड, गट नं. ९९, आलेगाव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणे, महाराष्ट्र यांच्या प्रस्तावित ऊस गाळप क्षमता विस्तार ७,५००.० टन पासून २०,०००.० टन

प्रतिदिन पर्यंत, सहवीज निर्मिती क्षमता विस्तार १८.० मेगावॅटपासून ८२.० मेगावॅटपर्यत क्षमता विस्तार प्रकल्पाची पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी आयोजित करण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळास अर्ज प्राप्त झाला. सदरहू प्रकल्प पर्यावरण अधिसूचना २००६ आणि सुधारित नुसार संवर्ग ब-१ शेड्युल ५ (जे) १ (डी) मध्ये मोडत असल्याने सदरहू प्रकल्पास महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागाची "पर्यावरण अनुमती" प्राप्त करणे व त्यासाठी आगाऊ पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी घेणे बंधनकारक आहे.

समन्वयक यांनी असे स्पष्टीकरण दिले की पर्यावरण विषयक जाहिर लोकसुनावणीचा मूळ उद्देश प्रकल्प परिसरातील सामान्य जनतेस प्रकल्पाविषयी व प्रकल्पामुळे होणारे परिणाम व त्याबाबत सामान्य जनतेच्या भावना जाणून घेणे, प्रकल्पात बंधनकारक असणा-या प्रदूषण नियंत्रण संयत्रणेची माहिती सामान्य जनतेस देणे व त्यांनी दिलेल्या सूचनेचा विचार करणे आहे.

प्रकल्प प्रवर्तकांनी महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभागातील तज्ज्ञ समितीस प्राथमिक मान्यता (ToR) प्रदान करण्यासाठी व पर्यावरण आघात मुल्यांकन अहवाल तयार करण्यासाठी ऑनलाईन अर्ज दिनांक १७-०६-२०२२ रोजी सादर केला व त्या अर्जास पर्यावरण व वातावरण बदल विभाग, महाराष्ट्र शासन यांनी दिनांक २२.०६.२०२२ रोजी ऑनलाईन मंजूरी प्रदान केली.

जिल्हाधिकारी, पुणे यांनी प्रत्यक्ष (Physical) पर्यावरणविषयक जनसुनावणी घेण्यास गुरुवार, दिनांक ०६ ऑक्टोबर, २०२२ रोजी सकाळी १२.०० वाजता मान्यता दिल्यानंतर सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांनी भारत सरकारच्या पर्यावरण, वने व हवामान बदल मंत्रालयाच्या अधिसुचना दिनांक १४-०९-२००६ व सुधारित अधिसुचना दिनांक ०१-१२-२००९ अनुसार त्यांच्या कार्यालयीन आदेश क्रं. ई-४५/२०२२ ,व्दारा पत्र क्रं.बीओ/जेडी/डब्लुपीसी/पीएच/बी २२०९२०एफटीएस०२३१ दिनांक २०.०९.२०२२ अन्वये खालीलप्रमाणे पर्यावरण विषयक जाहिर जनसुनावणी समिती गठित केलीः-

१) जिल्हादंडाधिकारी, पुणे किंवा त्यांचे प्रतिनिधी (अतिरिक्त जिल्हादंडाधिकारी यांच्यापेक्षा कमी दर्जाचा नसावा) – **अध्यक्ष**

२) महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई यांचे प्रतिनिधी - - **सदस्य**

३) प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे

४) उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१ महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे -**समन्वयक**

समन्वयक यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार जनसुनावणीच्या ३० दिवस अगोदर सदर प्रकल्पाची जनसुनावणी प्रकल्प स्थानावर आज गुरुवार दिनांक ०६-१०-२०२२ रोजी दुपारी १२.०० वाजता असल्याची जाहिर सूचना दिनांक ३० ऑगस्ट, २०२२ च्या स्थानिक वृत्तपत्र लोकसत्ता यात मराठीत व राष्ट्रीय वृत्तपत्र इंडियन एक्सप्रेस यात इंग्रजीत प्रसिध्द करण्यात आलेली होती. त्यात प्रस्तावित प्रकल्पाविषयी पर्यावरणीय सूचना, टीकाटिप्पणी, आक्षेप जनतेस, पर्यावरण क्षेत्रात काम करणा-या संस्था यांना करण्यात आलेले होते.

तसेच या प्रकल्पाचे दस्तावेज म्हणजे पर्यावरण मुल्यांकन आघाताची व कार्यकारी सारांश अहवालाची इंग्रजी व मराठी प्रत जनतेच्या माहितीसाठी व अवलोकनार्थ शासनाच्या खालील अधिसूचित कार्यालयांमध्ये उपलब्ध करण्यात आलेले होतेः-

१) मा. जिल्हाधिकारी, पुणे,
२) मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद, पुणे,
३) महाव्यवस्थापक,जिल्हा उद्योग केंद्र, पुणे,
४) उप विभागीय अधिकारी,दौंड-पुरंदर, सासवड, तालुका-पुरंदर, जिल्हा - पुणे,
५) तहसील कार्यालय, दौंड, तालुका-दौंड, जिल्हा-पुणे,
६) पंचायत समिती कार्यालय, दौंड, तालुका-दौंड, जिल्हा-पुणे,
७) ग्रामपंचायत कार्यालय-आलेगाव, देऊळगाव राजे, बोरीवेल, खोरवडी, लिंगाळी, वडगाव दरेकर, तालुका-दौड, जिल्हा-पुणे,
८) पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, १५वा मजला, नवीन प्रशासन इमारत, मादाम कामा रस्ता, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२,

९) सदस्य सचिव, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, कल्पतरु पॉईंट, तिसरा मजला, सायन-माटुंगा स्किम रोड नं.६, पीव्हीआर सिनेमागृहासमोर, सायन सर्कल जवळ, सायन (पूर्व), मुंबई - ४०० ०२२,

१०) प्रादेशिक अधिकारी,पुणे व उप-प्रादेशिक अधिकारी,पुणे-१,महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ,जोग सेंटर, तिसरा मजला, वाकडेवाडी, जुना पुणे-मुंबई रस्ता, पुणे - ४११ ००३,

११) संकेतस्थळ, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, मुंबई.

यांनी सांगितले की उपरोक्त प्रकल्पाविषयी एक सुचना महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

समन्वयक यांनी सांगितले की प्रस्तावित प्रकल्पाविषयी लेखी सूचना द्यावयाच्या असल्यास त्या म.प्र.नि.मंडळाच्या प्रतिनिधीकडे देण्यात याव्यात. त्या अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांना सादर करता येतील. ज्यांना तोंडी प्रश्न विचारायचे असतील, त्यांनी सादरीकरणानंतर आपले नांव व गाव स्पष्टपणे सांगून मांडावेत. प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरण सल्लागार त्या प्रश्नांची उत्तरे देतील.

सदरहू बैठकीचे इतिवृत्त तयार करण्यात येऊन ते म.प्र.नि.मंडळाच्या मुख्यालयातर्फे पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन, मुंबई यांना सादर करण्यात येईल. ही समिती फक्त लोकांचे मत, सूचना, आक्षेप नोंदविण्यासाठी असून कोणताही निर्णय वा शिफारस करण्याचा अधिकार या समितीस नाही. सदरहू सूचना/आक्षेप यांची इतिवृतान्तात नोंद घेण्यात येईल. त्याचप्रमाणे सदरहू बैठकीची व्हिडिओ रेकॉर्डींग जशीच्या तशी चित्रफित, बैठकीत उपस्थित सूचना, आक्षेप यांची नोंद घेऊन प्रकल्प प्रवर्तकास सुधारित पर्यावरण मुल्यांकन अहवाल पर्यावरण विभागास सादर करावयाचा असतो. त्यावर तेथील तज्ज्ञ समिती त्याबाबत पुढील निर्णय घेते. त्यांनी अध्यक्षांना प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याचे आदेश देण्याची विनंती केली.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रकल्प प्रवर्तकांना सादरीकरण सुरु करण्याची सूचना केली.

अध्यक्षांच्या परवानगीने प्रकल्पाचे पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाविषयी संपूर्ण पर्यावरण व्यवस्थापन योजनेबाबत सादरीकरण केले.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की पर्यावरण आघात मुल्यांकन अधिसूचनेनुसार सदरहू प्रकल्प हा संवर्ग B१ ५ (j), १(d) मध्ये मोडत असून त्यास महाराष्ट्र शासनाच्या

पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन राज्य प्रभाव आकलन प्राधिकरणाची पर्यावरण अनुमती (Environment Clearance) प्राप्त करणे बंधनकारक आहे.

प्रकल्प पर्यावरण सल्लागार यांनी प्रस्तावित प्रकल्पाचे भौगोलिक स्थान, प्रस्तावित प्रकल्पामुळे पर्यावरणावरील संभाव्य आघात, त्यासाठी तयार करण्यात आलेल्या पर्यावरण व्यवस्थापन योजना याबाबत माहिती दिली.

त्यांनी सांगितले की सदरहू प्रकल्पामुळे ४५० व्यक्तींना प्रत्यक्ष रोजगाराची संधि मिळणार आहे. मात्र सदरहू प्रकल्पामुळे प्रकल्प परिसरात अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

प्रकल्पाची एकूण भांडवली गुंतवणूक रुपये ५८३.९९ कोटी आहे. तर पर्यावरण संरक्षणासाठी रुपये २७.१० कोटी एवढा प्रती वर्षी आहे.

सादरीकरण झाल्यानंतर उपस्थितांना त्यांच्या सूचना, आक्षेप, टीकाटिप्पणी उपस्थित करण्याचे आवाहन करण्यात आले. सूचना किंवा आक्षेप नोंदविताना आपले नाव व गावाचे नाव सांगण्याची सूचना करण्यात आली.

**खालील व्यक्तींनी चर्चेत भाग घेतला व त्यास पर्यावरण सल्लागार / प्रकल्प प्रवर्तक/पर्यावरणविषयक जनसुनावणी यांनी दिलेली उत्तरेः-**

१) **श्री सुहास जगदाळे, राहणार-लिंगाळी,तालुका-दौड, जिल्हा-पुणेः**

प्रकल्प विस्तारिकरणामुळे जे ध्वनी प्रदूषण होणार आहे, त्यावर कारखान्याने कोणत्या उपाययोजना केलेल्या आहेत काय?

प्रकल्पाच्या पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की प्रकल्पात जे बॉयलर व टर्बाईन्स असतात, त्या ठिकाणी ध्वनि उत्पन्न होणारे स्त्रोत असल्याने ते कारखान्याच्या वेगळ्या जागेत स्थापित करण्यात येतात. त्यास ध्वनी नियंत्रणाकरीता अकॉस्टीक ईनक्लोजर बसवण्यात येतील. त्यामुळे कारखाना परिसरातील लोकांना ध्वनी प्रदुषणाचा त्रास होणार नाही.

२) **श्री सावळराम गवडे, राहणार-खोरवडी,तालुका-दौंड,जिल्हा-पुणेः-**

प्रस्तावित प्रकल्पातून हानीकारक पदार्थ निर्माण होणार आहेत, त्याची विल्हेवाट कशी लावण्यात येईल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पातील हानीकारक पदार्थ म्हणजे सांडपाणी, घनकचरा व प्रकल्पातील घातक कचरा (Hazardous Waste). उत्पादनात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा उत्पादनात पुनर्वापर करण्याचे नियोजन केलेल आहे. सांडपाण्याचा एकही थेंब हा प्रकल्पाबाहेर जाणार नाही.

प्रकल्पात उत्पन्न होणार घन कचरा म्हणजे ब्रॉयलरची राख, ईटीपी स्लज. ते व्यवस्थित गोळा करुन खत म्हणून वापरण्यात येईल. बगॅसची राख ही खत म्हणून देतात. स्पेंट वॉश राख ही अतिशय उत्तम असून त्यात व्हॅल्यू अडिशन मिळते. ती पोटॅश रिकव्हरीसाठी देण्यात येते.

प्रकल्पात उत्पन्न होणारी हानीकारक द्रव्य ही पर्यावरणात सोडली जाणार नाहीत. जे तयार होतील, त्यावर शास्त्रोक्त प्रक्रिया करुन त्याचा पुर्नवापर करण्यात येईल.

३) <u>श्री गणेश बारावकर, राहणार-माळीवाडी, तालुका-दौंड,जिल्हा-पुणेः-</u>

आपल्या प्रकल्पात उत्पन्न होणारे सांडपाणी हे परिसरातील शेतक-यांना वापरता येईल काय?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की पूर्वी साखर कारखान्यातील उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया करुन ते प्रक्रिया केलेले सांडपाणी शेतात वापरले जायचे. मात्र केंद्र व राज्य शासनाच्या नवीन नियमांप्रमाणे कारखान्यास प्रक्रिया केलेल्या सांडपाण्याचा उत्पादन प्रक्रियेत पुर्नवापर करणे बंधनकारक करण्यात आलेले आहे.त्यामुळे कारखान्याची ताज्या पाण्याची गरज कमी झाल्याने ते पाणी जनतेच्या वापरासाठी उपलब्ध राहते.

कारखान्यात रेन वॉटर हार्व्हेस्टीग योजना राबविण्यात आलेली आहे. त्यामुळे या परिसरातील भूजलाच्या पातळीत वाढ झालेली आहे. कारखान्यामुळे अप्रत्यक्ष फायदा परिसरास मिळत आहे.

४) <u>श्री सुभाष नारायण काटील, राहणार-लिंगाळी,तालुका--दौंड, जिल्हा-पुणेः-</u>

विस्तारिकरणानंतर सहवीज प्रकल्पातून जी वीज निर्मिती होणार, ती किती होईल व शेतक-यांना, आजूबाजूच्या गावांना त्याचा काही फायदा होईल काय?

प्रकल्पात १८.० मेगावॅट वीजेचे उत्पादन होत असून प्रस्तवित प्रकल्पातुन ८२.० मेगावॅट वीजेचे उत्पादन करण्यात येणार आहे. कारखान्यास स्वतःसाठी १०-१२ मेगावॅट कारखान्यासाठी वीज लागते. उर्वरित वीज ही एमसईबीला कराराप्रमाणे द्यावी लागते.

५) **श्री अमित गिरमकर, राहणार-देऊळगाव राजे, तालुका-दौड, जिल्हा-पुणेः-**

प्रस्तावित प्रकल्पात उत्पन्न होणा-या सांडपाण्यावर प्रक्रिया केल्यानंतर सांडपाण्याची गुणवत्ता काय असेल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रक्रिया केलेले सांडपाण्याची गुणवत्ता महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांप्रमाणेच असावे लागते. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या मानकांपेक्षा आमची गुणवत्ता कमी असते.

६) **श्री प्रसाद दरेकर, राहणार-आलेगांव,तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-**

प्रकल्पाचे विस्तारिकरण होत आहे. तर विस्तारिकरणाचा एकूण खर्च किती होईल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रस्तावित साखर कारखाना व सहवीज प्रकल्प विस्तारिकरणासाठी सुमारे ५८५ कोटी रुपये खर्च येईल.

७) **श्री दत्तात्रय पाचपुते, राहणार-बोरीवेल,तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-**

माझे गाव कारखान्याच्या शेजारी आहे. आमच्या गावाला या कारखान्याचा काय फायदा आहे?

पर्यावरण सल्लागार यांनी उत्तर दिले की कारखान्याच्या आजुबाजुच्या परिसरातील शेतक-याच्या ऊसाचे गाळप वेळेत होईल तसेच कारखान्यामुळे अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड वाढ झालेली असेल.

८) **श्री मिलिंद साळुंखे, राहणार-लिंगाळी, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-**

विस्तारित प्रकल्पाच्या घन कच-याचे व्यवस्थापन कसे करण्यात येईल?

घन कच-याची विल्हेवाट नियमाप्रमाणे केली जाईल. त्याकरीता सक्षम यंत्रणा उभरण्यात येईल.

९) **श्री नंदकिशोर रमेश पाचपुते, सरपंच, बोरीवेल, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-**

विस्तारिकरण प्रकल्पात बॉयलरमुळे होणा-या हवा प्रदूषण नियंत्रणासाठी कोणत्या उपाययोजना करण्यात येतील?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हवा प्रदूषण नियंत्रणासाठी चिमणीस ईएसपी ही अत्यावत सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. तसेच कमी प्रदुषणकारी इंधन म्हणून बगॅसचा वापर करण्यात येईल.

१०)**<u>श्री मिलिंद नागवे, गाव-वडगाव दरेकर, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>**

या प्रकल्पासाठी कच्चा माल लागेल, त्याचे नियोजन कसे करण्यात येईल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की शेतक-यांनी उत्पादित केलेला ऊस घेण्यात येईल व त्याचे गाळप करुन उत्पादन घेण्यात येईल.

**११) <u>श्री सुनंदा रेड्डी, पर्यावरणवादी, हैद्राबादः-</u>**

श्री सुनंदा रेड्डी यांनी प्रकल्पास पाठिंबा व्यक्त करून पर्यावरण अनुमती लवकर प्रदान करण्याची विनंती केली.

१२) **<u>श्री माऊली अवचर,वडगाव दरेकर, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>**

या प्रकल्पामुळे स्थानिक लोकांच्या आरोग्यावर काही परिणाम होईल काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की प्रकल्पात प्रदुषण नियंत्राणकरीता योग्य त्या उपाययोजना करण्यात येतील त्यामुळे स्थानिकांच्या आरोग्यावर काहीही परिणाम होणार नाही.

**१३) <u>श्री पांडुरंग बाराते,वडगाव दरेकर, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>**

विस्तारिकरणामध्ये नवीन वीज प्रकल्प साधारण किती दिवस चालू राहिल?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की साधारणतः जर साखर कारखाना १८० दिवस चालला, तर सहविद्युत प्रकल्प हा सात-आठ महिने चालतो.

**१४) <u>श्री मधुकर दत्तात्रय पाचपुते, राहणार-बोरीवेल, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>**

नवीन विस्तारिकरणामुळे रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध होणार आहेत काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की नवीन विस्तारीकरण प्रकल्पामुळे सुमारे ४०० नवीन रोजगारनिर्मिती निर्माण होईल तसेच अप्रत्यक्ष व्यवसायात प्रचंड प्रमाणात वाढ होईल.

१५) **<u>श्री अशोक विठ्ठल कदम, राहणार-आलेगाव, तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>**

विस्तारिकरण प्रकल्पात हवा प्रदूषण नियंत्रणासाठी कोणती अत्याधुनिक उपकरणे वापरणार आहात.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हवा प्रदूषण नियंत्रणासाठी चिमणीस ईएसपी ही अत्यावत सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. तसेच कमी प्रदुषणकारी इंधन म्हणून बगॅसचा वापर करण्यात येईल.

१६)**<u>श्री सतीश महादेव जगदाळे,राहणार-लिंगाळी,तालुका-दौंड, जिल्हा-पुणे</u>**

नवीन विस्तारित प्रकल्पाच्या अनुषंगाने अतिरिक्त झाडे लावण्याचे नियोजन आहे काय?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की मानकांच्या प्रमाणे प्रकल्प प्रवर्तकांनी ३३% हरित पट्टा विकसित करण्यात आलेला आहे. त्यात वाढ करण्यात येईल. त्याचप्रमाणे कारखान्याच्या आजूबाजूच्या भागात झाडे लावून जगवली आहेत. कारखान्याची स्वतःची नर्सरी अद्यावत आहे. तर ग्रामपंचायतीत जागा उपलब्ध केल्यास हरितपट्टा विकसित करणयात येईल.

१७)**<u>श्री संजू गावडे, राहणार-मेरगळवाडी,तालुका-दौंड, जिल्हा-पुणेः-</u>**

कारखान्यातर्फे जल, वायू व ध्वनिची तपासणी केली जाते, ती कुठल्या संस्थेमार्फत केली जाते?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की एनएबीएल मान्यताप्राप्त प्रयोगशाळेमार्फत जल, वायू व ध्वनिची तपासणी केली जाते.

१८) **<u>श्री काशीनाथ जगदाळे, राहणार-लिंगाळी,तालुका-दौंड,जिल्हा-पुणेः-</u>**

कारखाना चालू झाल्यानंतर बॉयलरमधील जी राख बाहेर पडते, त्याचा पीकांवर परिणाम होतो. त्यावर कोणत्या उपाययोजना करण्यात येतील ?

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की हवा प्रदूषण नियंत्रणासाठी चिमणीस ईएसपी ही अत्यावत सयंत्रणा कार्यान्वित करण्यात येईल. तसेच कमी प्रदुषणकारी इंधन म्हणून बगॅसचा वापर करण्यात येईल.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी येथे सांगितले की शेतक-यांच्या वेगवेगळ्या प्रश्नांमधून ब-याच शंकांचे निरसन पर्यावरण सल्लागारकडून झालेले आहे.

१९) **<u>अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समितीः-</u>**

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी प्रश्न विचारला की कार्यरत ईएसपीची जी क्षमता (capacity) आहे, व नवीन ईएसपीची जी क्षमता (capacity) आहे, त्यात फरक राहणार, तर काजळी हाच विषय उपस्थितांनी उपस्थित केलेला असून तो संवेदनशील (sensitive) होतो. तर कार्यरत प्रकल्पात काही त्रास झालेला नसला तरी नवीन प्रकल्पामुळे तो होऊ शकतो ही त्यांची धारणा आहे. ती विचारात घेण्यात यावी.

पर्यावरण सल्लागार यांनी सांगितले की नवीन ब्रॉयलरला नवीन ईएसपी येणार. तर ईएसपीची क्षमता ही फिल्डवरुन मोजली जाते. जेवढे फिल्ड जास्त, तेवढी गुणवत्ता चांगली. प्रकल्पात बगॅस आधारित चिमणीसाठी पाच फिल्डचे ईएसपी लावण्यात आले व त्यांनी क्षमता सिध्द केलेली आहे. जर गरज पडली तर ईएसपी सुधारणा करुन सहा फिल्डचा करता येतो.

अध्यक्ष, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की रोजगाराच्या संधिबाबत योग्य प्रकारे उत्तर देण्यात आलेले नाही. कार्यरत प्रकल्पात रोजगाराची संधि योग्य प्रकारे होती. भविष्यात अप्रत्यक्ष रोजगार किती उपलब्ध होणार आहे, शेतातील पीकाला-ऊसाला त्वरित खरेदीदार कसा मिळणार आहे, त्याचा तुम्हाला फायदा होणार, कारण येथील शेतक-यांचा ऊसच प्राधान्याने घेतला जाईल, याबाबत माहिती देण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी सांगितले की नवीन विस्तारिकरण प्रकल्पामुळे रोजगाराची संधि निश्चितच वाढणार आहे. प्रकल्पात आवश्यक असणारा तांत्रिक कामगार दौड तालुक्यातील असल्यास त्याला प्राधान्य देण्यात येईल .

त्यांनी पुढे सांगितले की हा कारखाना सुरु होण्याअगोदर परिसरातील ऊस तोडणी व गाळप यांची परिस्थिती अगदी गंभीर होती. आता या विस्तारिकरण प्रकल्पामुळे परिसरातील सर्व शेतक-यांच्या ऊसाचे गाळप करण्यात येईल.

प्रकल्प प्रवर्तकांचे कार्यकारी संचालक यांनी माहिती दिली की गेले १२-१३ वर्षे सातत्याने ऊसाचा दर कारखान्याकडून वाढविण्यात येत आहे.

सदस्य, पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती यांनी मत मांडले की सदरहू प्रकल्प हा महत्वकांक्षी प्रकल्प आहे. याचा परिसरातील सर्व शेतक-यांना निश्चितच फायदा होणार आहे. पर्यावरण सल्लागार यांनी सादरीकरण चांगले केले. प्रगतीबरोबरच प्रदूषण नियंत्रण करण्यासाठी प्रकल्प प्रवर्तक यांनी सांडपाण्यावर प्रक्रिया करुन त्याचा प्रकल्पात पुनर्वापर, हवा प्रदूषण नियंत्रणासाठी ईएसपी ही अत्यावत यंत्रणा बसवावी, घनकचरा हाताळणी व विल्हेवाट शास्त्रोक्त पध्दतीने करण्यात यावी.

प्रकल्प प्रवर्तकांनी जी प्रदूषण नियंत्रण सयंत्रणा प्रस्तावित केलेल्या आहेत,(ईएसपी, ईटीपी) तशी उभारणी करुन भविष्यात ते कार्यान्वित करतील. प्रदूषणाचा दुष्परिणाम होणार नाही याची त्यांनी दक्षता प्रकल्प प्रवर्तकांनी घ्यावी. त्याचप्रमाणे म.प्र.नि. मंडळाने पारित केलेल्या अटी व शर्तीनुसार नियतकालिक निरीक्षण (Periodical Monitoring) करण्यात यावे. तीन महिन्यांनी, सहा महिन्यांनी, वर्षांनी या प्रकल्पाचा पर्यावरणावर जो काही परिणाम झालेला आहे, याबाबत प्रस्ताव व अहवाल सादर केला पाहिजे. प्रकल्प प्रवर्तकांनी सीएसआर निधी अंतर्गत सामाजिक बांधिलकी खूप चांगल्या प्रकारे जपलेली आहे.

त्यांनी सांगितले की मला असे सूचवायचे आहे की प्रकल्प गावात काही मूळ प्रश्न असतात, ते मार्गी लावणे आवश्यक आहे उदा. नागरी घन कचरा, घरगुती सांडपाणी, मैला सांडपाणी. त्यांनी स्लाईड्स दाखविल्या,तेथे अल्गली फॉर्मेशन झालेले आहे. ते स्थिर (stagnant) आहे. तर सीएसआर निधीतून त्याबाबत जर मॉडेल म्हणून काम केले, तर इतर कारखान्यांना तो एक आदर्श राहिल. प्रकल्प प्रवर्तकांनी समाजाच्या हितासाठी त्याबाबत पुढील कार्यवाही करावी. सदरहू प्रस्तावित प्रकल्प हा चांगला व महत्वकांक्षी आहे असे नमुद केले.

अध्यक्ष यांनी समारोप करताना दोन सूचना केल्या.

अ) कमीतकमी ३३% हरितपट्टा विकसित करणे हे बंधनकारक आहे, आपण आपल्या ३५ एकरात तो विकसित केलेला आहे. मात्र जास्तीजास्त करण्यास बंधन नाही. तर ३५ एकरमध्ये झाडांची घनता वाढविता आल्यास चांगले होईल.

आ) तसेच सदस्य यांनी सूचना केल्याप्रमाणे सीएसआर निधी ५% प्रकल्पाच्या खर्चानुसार केलेला आहे. सीएसआर जास्त खर्च करता येण्यासारखा आहे. गावातील काही योजनांना शासनाकडून पैसे मिळत नाही. तर अशा योजना हाती घ्याव्या अशी ग्रामस्थांचीही इच्छा दिसते.

बैठकीचा समारोप करताना अध्यक्ष यांनी सांगितले की बैठकीत उपस्थित करण्यात आलेल्या सूचना, आक्षेप यांची नोंद घेण्यात आलेली असून त्यांचा बैठकीच्या इतिवृत्तात समावेश करण्यात येऊन प्राप्त झालेल्या लेखी सूचना, आक्षेपांसह महाराष्ट्र शासनाच्या पर्यावरण व वातावरणीय बदल विभाग, महाराष्ट्र शासन राज्य प्रभाव आकलन प्राधिकरणाच्या राज्य पर्यावरण मुल्यांकन समितीस सादर करण्यात येतील. सदरहू तज्ज्ञ समिती ही त्याबाबत योग्य तो निर्णय घेईल.

अध्यक्ष यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले व जनसुनावणी संपन्न् झाल्याचे घोषित केले.

सदरहू जनसुनावणी बैठकीत प्राप्त झालेले एक सूचना सोबत जोडलेले आहेत.

| | | |
|---|---|---|
| **(प्रताप जगताप),**<br>समन्वयक,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती<br>तथा<br>उप प्रादेशिक अधिकारी, पुणे-१, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | **(शंकर वाघमारे)**<br>सदस्य,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती<br>तथा प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ, पुणे | **(संजय तेली)**<br>अध्यक्ष,<br>पर्यावरणविषयक जाहिर जनसुनावणी समिती<br>तथा<br>अपर जिल्हादंडाधिकारी, पुणे जिल्हा-पुणे |